**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार**

**अपिल क्रमांक : तक्रार क्र -१८७४/२०२१**

**तक्रारकर्ता,** श्री.चंद्रहास गोविंद तावडे,
३/२१, मनिष को.ऑ.हौ.सोसा.,
वृंदावन सोसायटी कॉम्पलेक्स, ठाणे (प),
ता.जि.ठाणे ४०० ६०१.

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक, ठाणे महानगरपालिका ठाणे, महापालिका भवन, सरसेनानी अरुणकुमार वैद्य मार्ग, चंदनवाडी, पाचपाखाडी, ठाणे जि.ठाणे ४०० ६०२.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक, ठाणे महानगरपालिका ठाणे, महापालिका भवन, सरसेनानी अरुणकुमार वैद्य मार्ग, चंदनवाडी, पाचपाखाडी, ठाणे जि.ठाणे ४०० ६०२

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधिक्षक, छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय व राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालय कळवा, ठाणे महानगरपालिका ठाणे, कळवा बेलापूर रोड, कळवा, जि.ठाणे ४००६०५.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधिक्षक, छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय व राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालय कळवा, ठाणे महानगरपालिका ठाणे, कळवा बेलापूर रोड, कळवा, जि.ठाणे ४००६०५.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : ११.९.२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २६.११.२०२० | २२.१२.२०२०<br>२५.२.२०२१ | २८.१२.२०२० | १४.१.२०२१ |

तक्रारकर्ता यांनी दि.१.१२.२०२१ रोजीच्या अर्जान्वये "माहिती प्राप्त झालेली नाही." असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जात त्यांनी संबंधितांवर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी विनंती केली आहे.

सदर तक्रार अर्जावर आज दिनांक ११.९.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. ललित भटू सुर्यवंशी, विधी अधिकारी तथा कार्यकारी अधिकारी, राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालय कळवा, विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम. राधिका कांबळी, आस्थापना अधिक्षक, तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम. रश्मी कांबळे, (सेवानिवृत्त), श्रीम. रजू पवार (सेवानिवृत्त), आस्थापना अधिक्षक, ठाणे महानगरपालिका ठाणे या उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

*"(डॉ. सुचित कामखेडकर, वैद्यकीय अधिकारी यांचे नियुक्तीबाबत)"*

*"(छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय/राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालय येथे शरीररचनाशास्त्र (अॅनॅटॉमी) विभागात कार्यरत वैद्यकीय अधिकारी प्रा.डॉ.सुचितकुमार कामखेडकर यांचे नियुक्तीबाबत कृपया पुढीलप्रमाणे माहिती देण्यात यावी.)"*

*"(१) डॉ. कामखेडकर यांचे नियुक्तीचे वेळी अवलंबिलेल्या भरती प्रक्रीयेसंदर्भातील सर्व कागदपत्रे. (२) डॉ. कामखेडकर यांना मुलाखतीसाठी बोलविण्यात आलेले पत्र. (३) डॉ. कामखेडकर यांची मुलाखतीस उपस्थित पॅनेल सदस्य. (४) डॉ. कामखेडकर यांना मुलाखतीत प्राप्त झालेले गुण नोंद पत्रिका. (५) डॉ. कामखेडकर यांना देण्यात आलेले नियुक्ती आदेश. (६) डॉ. कामखेडकर यांची सेवा नियमित करण्यात आलेबाबत आदेश. (६) डॉ. कामखेडकर यांची सेवा नियमित करण्यात आलेबाबत*

*आदेश. (७) वरील प्रमाणे भरती प्रक्रीया व सेवा नियमित करो संदर्भातील संपूर्ण कार्यालयीन टिपणी व त्यास घेतलेली प्रशासकीय मान्यता.)"*

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी जोडपत्र ब मध्ये "माहिती प्राप्त झालेली नाही." असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१४.१.२०२१ रोजी सुनावणी घेऊन, "*अपिलकर्ता यांनी मागणी केलेली माहिती छ.शि.म. रू. कळवा विभागाशी संबंधित असल्याने सदरची माहिती अपिलकर्ता यांना १५ दिवसांत उपलब्ध करून देणेबाबत संबंधित विभागाला पत्राने कळविण्यात यावे.*" असे आदेश पारित करून अपिल निकाली काढले आहे.

या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी असे निवेदन केले की, तक्रारकर्ता यांच्या माहिती अर्जातील अंशत: माहिती ही जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता (मुख्यालय) सार्वजनिक आरोग्य विभाग, ठाणे महानगरपालिका, ठाणे या विभागाशी संबंधित असल्याने सदरचा माहिती अर्ज तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांनी दि.२२.१२.२०२० रोजीच्या पत्राद्वारे संबंधित विभागास हस्तांतर केला होता. त्यामुळे तक्रारकर्ता यांना माहिती उपलब्ध करून देण्याची जबाबदारी ही सार्वजनिक आरोग्य विभाग यांची आहे.

तक्रारकर्ता यांनी असे निवेदन केले की, त्यांना केवळ मुद्दा क्र. ५ व ६ या २ मुद्दयांची माहिती प्राप्त झाली आहे. ती माहिती राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालय व छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय कळवा या २ रूग्णालयांची माहिती प्राप्त झाली आहे.

प्रकरणातील कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर असे दिसून येते की, सदरचा अर्ज हा सार्वजनिक आरोग्य विभागाच्या जन माहिती अधिका-यांकडे दि.२२.१२.२०२० रोजी हस्तांतर करण्यात आला असल्याने प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणीची सूचना जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता (मुख्यालय), सार्वजनिक आरोग्य विभाग, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांना काढणे उचित होईल. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.३०.१०.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.**

सही/-

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ११ सप्टेंबर, २०२५

**<u>प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना</u>**

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता (मुख्यालय),
सार्वजनिक आरोग्य विभाग, ठाणे महानगरपालिका, ठाणे,
महापालिका भवन, सरसेनानी अरुणकुमार वैद्य मार्ग, चंदनवाडी,
पाचपाखाडी, ठाणे जि.ठाणे ४०० ६०२.

**<u>- यांना प्रत</u>**

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता (मुख्यालय),
सार्वजनिक आरोग्य विभाग, ठाणे महानगरपालिका, ठाणे,
महापालिका भवन, सरसेनानी अरुणकुमार वैद्य मार्ग, चंदनवाडी, पाचपाखाडी, ठाणे जि.ठाणे ४०० ६०२ **<u>यांचेमार्फत रवाना.</u>**

**अपिल क्रमांक : तक्रार क्र -१८७४/२०२१**

**तक्रारकर्ता,** श्री.चंद्रहास गोविंद तावडे,

**सुनावणी दिनांक ३०.१०.२०२५ (In continuation of order dt.२१.८.२०२५)**

**<u>विवेचन</u>**

सदर सुनावणीस तक्रारकर्ता तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. ललित भटू सुर्यवंशी, कार्यालयीन अधिक्षक, राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालय कळवा, विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम. राधिका कांबळी, आस्थापना अधिक्षक, तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम. रश्मी गायकवाड, (सेवानिवृत्त), तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम. रंजू मारुती पवार

(सेवानिवृत्त), आस्थापना अधिक्षक, ठाणे महानगरपालिका ठाणे आणि विद्यमान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. कल्पेश भसागरे, लिपिक, सार्वजनिक आरोग्य विभाग, ठाणे महानगरपालिका ठाणे हे उपस्थित आहेत.

या प्रकरणी सार्वजनिक आरोग्य विभाग यामधील जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. कल्पेश भसागरे हे उपस्थित आहेत. त्यांनी असे निवेदन केले की, डॉ. कामखेडकर, वैद्यकीय अधिकारी यांचे नियुक्तीबाबत पत्र केवळ त्यांच्या कार्यालयाकडून निर्गमित झाले आहे. तथापि, या संदर्भातील नस्ती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही.

जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. कल्पेश भसागरे यांचे हे निवदेन अतिशय गंभीर स्वरूपाचे आहे. वैद्यकीय अधिकारी या पदावरील नियुक्तीबाबतची कागदपत्रे, असलेली धारीका ही उपलब्ध नाही किंवा ती गहाळ आहे त्यामुळे या संदर्भात तातडीने शोध घेऊन योग्य ती कार्यवाही करणे आवश्यक आहे. अशा रितीने शोध घेतल्यानंतरही धारीका आढळून न आल्यास संबंधित विभाग या संदर्भात काय कार्यवाही करणार आहे याबाबत सार्वजनिक आरोग्य विभागाचे प्रमुख असलेले वैद्यकीय आरोग्य अधिकारी, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांनी त्यांचे शपथपत्र आयोगाकडे पुढील सुनावणीस स्वत: उपस्थित राहून सादर करणे उचित होईल. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. **वैद्यकीय अधिकारी या पदावरील नियुक्तीबाबतची कागदपत्रे, असलेली धारीका ही उपलब्ध नाही किंवा ती गहाळ आहे त्यामुळे या संदर्भात तातडीने शोध घेऊन योग्य ती कार्यवाही करणे आवश्यक आहे. अशा रितीने शोध घेतल्यानंतरही धारीका आढळून न आल्यास संबंधित विभाग या संदर्भात काय कार्यवाही करणार आहे याबाबत सार्वजनिक आरोग्य विभागाचे प्रमुख असलेले वैद्यकीय आरोग्य अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांनी त्यांचे शपथपत्र आयोगाकडे दि.११.१२.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता स्वत: उपस्थित राहून सादर करावे.**

२. **प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि. ११.१२.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.**

सही/-

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ३० ऑक्टोबर, २०२५

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
**वैद्यकीय आरोग्य अधिकारी,**
**सार्वजनिक आरोग्य विभाग, ठाणे महानगरपालिका, ठाणे,**
**महापालिका भवन, सरसेनानी अरुणकुमार वैद्य मार्ग, चंदनवाडी,**
**पाचपाखाडी, ठाणे जि.ठाणे ४०० ६०२.**

**अपिल क्रमांक : तक्रार क्र -१८७४/२०२१**
**तक्रारकर्ता,** श्री.चंद्रहास गोविंद तावडे,
**सुनावणी दिनांक ११.१२.२०२५ (In continuation of order dt.३०.१०.२०२५)**

**विवेचन**

सदर सुनावणीस तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत.(कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त झालेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). तथापि, विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.ललित भटू सुर्यवंशी, विधी अधिकारी तथा कार्यालयीन अधिक्षक, राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालय कळवा, ठाणे महानगरपालिका ठाणे हे उपस्थित आहेत.

या प्रकरणी तक्रारकर्ता यांनी ई-मेलद्वारे आयोगास असे कळविले आहे की, प्रकृती अस्वस्थतेमुळे ते आज सुनावणीस उपस्थित राहू शकत नाहीत. तरी प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणीसाठी तारीख देण्यात यावी.

त्याचप्रमाणे प्रथम अपिलिय अधिकारी डॉ. प्रसाद पाटील, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांनीही दि.१०.१२.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे आयोगास असे कळविले आहे की, त्यांना नागपूर येथे अधिवेशनाच्या कामकाजासाठी उपस्थित राहणे बंधनकारक असल्याने ते आजच्या सुनावणीस उपस्थित राहू शकत नाहीत.

राज्य माहिती आयोग,
कोंकण खंडपीठ

तक्रारकर्ता व प्रथम अपिलिय अधिकारी डॉ. प्रसाद पाटील, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांच्या विनंतीनुसार प्रस्तुत प्रकरण पुढील सुनावणीकरीता ठेवणे उचित होईल. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

**प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१२.२.२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.**

सही/-

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ११ डिसेंबर, २०२५

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
**वैद्यकीय आरोग्य अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग, ठाणे महानगरपालिका, ठाणे,**
**महापालिका भवन, सरसेनानी अरुणकुमार वैद्य मार्ग, चंदनवाडी, पाचपाखाडी, ठाणे जि.ठाणे ४०० ६०२.**

**अपिल क्रमांक : तक्रार क्र -१८७४/२०२१**
**तक्रारकर्ता, श्री.चंद्रहास गोविंद तावडे,**
**सुनावणी दिनांक १२.२.२०२६ (In continuation of order dt.११.१२.२०२५)**

**विवेचन**

सदर सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित आहेत.(कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त झालेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून,ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).तथापि,विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.ललित भट्ट सुर्यवंशी, विधी अधिकारी तथा कार्यालयीन अधिक्षक, राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालय कळवा, ठाणे महानगरपालिका ठाणे आणि डॉ. प्रसाद पाटील, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, ठाणे महानगरपालिका, ठाणे हे उपस्थित आहेत.

या प्रकरणी डॉ. प्रसाद पाटील, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांनी त्यांचे शपथपत्र आयोगास सादर केले. त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, आयोगाच्या दि.३०.१०.२०२५ रोजीच्या आदेशाच्या अनुषंगाने दि.३.१२.२०२५ रोजी सार्वजनिक आरोग्य विभागातील नस्ती गहाळ झाल्याबाबत आस्थापना विभाग, मुख्यालय, कार्यालयीन अधिक्षक, अधिष्ठाता, वैद्यकीय अधिक्षक छत्रपती शिवाजी महाराज रूग्णालय, कळवा यांना दि.३.१२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. त्यामुळे सदरची कार्यवाही पूर्ण करण्यास १५ दिवसांचा कालावधी लागेल. सबब, डॉ. प्रसाद पाटील, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांची विनंती मान्य करण्यात येत आहे. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

**प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.७.४.२०२६ रोजी दुपारी १.०० वाजता घेण्यात येईल.**

सही/-

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १२ फेब्रुवारी, २०२६

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
**डॉ. प्रसाद पाटील, वैद्यकीय आरोग्य अधिकारी,**
**सार्वजनिक आरोग्य विभाग, ठाणे महानगरपालिका, ठाणे,**
**महापालिका भवन, सरसेनानी अरुणकुमार वैद्य मार्ग, चंदनवाडी,**
**पाचपाखाडी, ठाणे जि.ठाणे ४०० ६०२.**

**अपिल क्रमांक : तक्रार क्र -१८७४/२०२१**
**तक्रारकर्ता, श्री.चंद्रहास गोविंद तावडे,**
**सुनावणी दिनांक ७.४.२०२६ (In continuation of order dt.१२.२.२०२६)**

**विवेचन**

सदर सुनावणीस तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत.(कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त झालेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). तथापि, विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.ललित भट्टू सुर्यवंशी, कार्यालयीन अधिक्षक, राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालय कळवा, ठाणे महानगरपालिका ठाणे आणि विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम. स्मिताली हुमरसकर, उपवैद्यकीय आरोग्य अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग, ठाणे महानगरपालिका, ठाणे या उपस्थित आहेत.

या प्रकरणी सुनावणी दरम्यान उपस्थित दोन्ही जन माहिती अधिकारी यांनी असे निवेदन केले की, अद्यापही संबंधित नस्तीचा शोध त्यांना लागलेला नाही. सबब, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांनी सदरची नस्ती त्यांच्या कार्यालयातून अनधिकृतरित्या गहाळ झाली असल्याने महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ च्या कलम ८ व ९ नुसार प्रथम खबरी अहवाल संबंधित पोलीस स्टेशन येथे दाखल करून त्याबाबतचा लेखी अहवाल आयोगाकडे पुढील सुनावणीस स्वत: उपस्थित राहून सादर करणे उचित होईल. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

**प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.३०.४.२०२६ रोजी दुपारी १.०० वाजता घेण्यात येईल.**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ७ एप्रिल, २०२६

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
**वैद्यकीय आरोग्य अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग, ठाणे महानगरपालिका, ठाणे,**
**महापालिका भवन, सरसेनानी अरुणकुमार वैद्य मार्ग, चंदनवाडी, पाचपाखाडी, ठाणे जि.ठाणे ४०० ६०२.**

राज्य माहिती आयोग,
कोंकण खंडपीठ

